# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:05.01.2026** **वार:सोमवार**

---

1. नव्याण्णव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप
2. मराठी रोजगाराची भाषा झाली पाहिजे; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन
3. राज्यात महापालिका निवडणुकांच्या प्रचाराला गती; बिनविरोध उमेदवार निवडीच्या मुद्यावरून आरोप-प्रत्यारोप आणि
4. 'एक धाव मराठी भाषेसाठी' या संकल्पनेसह रत्नागिरीत कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉन उत्साहात

**<u>साहित्य संमेलन</u>**

मराठी केवळ संवादाची भाषा न राहता ती रोजगाराची भाषा झाली पाहिजे. तिचं व्यावसायीक महत्व टिकवून ठेवत मराठीचं वैभव कायम ठेवणं हे केवळ आपलं कर्तव्य नसून ती आपली सर्वांची जबाबदारी आहे असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. सातारा इथं भरवण्यात आलेल्या नव्याण्णव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप समारंभात ते काल बोलत होते. ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानीत ज्येष्ठ साहित्यीक रघुवीर चौधरी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले....

**जी भाषा जात पात धर्माच्या पलीकडे जाऊन सर्वांना जोडते, तीच खऱ्या अर्थाने विश्वाची भाषा बनते. अशा प्रकारची भाषा आपली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याच्या कारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास प्रोत्साहन दिलं. आज मराठी भाषा कारभारात आहे. मराठीचा वापर महाराष्ट्र शासन सगळीकडे करते परंतु सर्वसामान्यांच्या व्यवहारात मराठीचा वापर कमी होतोय. कारण भाषेचा संबंध आपण नोकरी मिळण्याशी, अर्थकारणाशी जोडतो. भाषा काही केवळ पैसे कमवण्याचा मार्ग नाहीये. भाषा ही आपली अस्मिता आहे. भाषा ही आपली ओळख आहे. भाषा आपला अभिमान आहे. भाषा हेच आपलं अस्तित्व आहे. तुमची भाषा जर संपली तर एक दिवस तुमचं अस्तित्व देखील संपेल. हिंदी भाषेची शक्ती होणार नाही. मराठी भाषेचाच मान सन्मान वाढवला जाईल.**

महाराष्ट्रात मराठी भाषेसाठी साहित्यसंस्था, लेखक आणि शासन एकत्रित प्रयत्न करत असल्याचं चित्र दिलासादायक असल्याचं रघुवीर चौधरी यावेळी म्हणाले....

**ये जो सतारा है ना शिवाजी महाराज के साथ इसका संबंध है, इसलिए आज मैं यहाँ सतारा आया तो शिवाजी महाराज के संबंध के कारण ये भूमि के प्रति भी आदर जगा। मैं यहाँ आया इसमें तो विश्वास पाटिल जी से मिलने का गुजराती में उनका लंबा पौराणिक उपन्यास मृत्युंजय है, तो मैं यहाँ आया तो पाटिल साहब से मिला लेकिन आपका सम्मेलन अच्छा काम करता है। आपकी सरकार भी मराठी भाषा को पढ़ाती है तो ये सभी राज्य नहीं करते है महाराष्ट्र अपनी भाषा के लिए जो काम करता है अच्छी बात है।**

मराठी भाषेतील रसग्रहण, अलंकार, विनोद नवीन पिढीला कळावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज असल्याचं संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांनी सांगितलं. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचं 100वं मराठी साहित्य संमेलन पुण्यात होणार असल्याची घोषणा महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी समारोप समारंभात केली. शाळांमध्ये तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषेच्या सक्तीसाठी नेमण्यात आलेली समिती रद्द करणं, बंद पडलेल्या मराठी माध्यमाच्या शाळा पुन्हा सुरू करणं, राज्याचं मराठी भाषा धोरण जाहीर करणं, आंतरराष्ट्रीय मराठी विद्यापीठ स्थापन करणं, यासह एकंदर 17 ठराव या संमेलनात मांडण्यात आले.

**<u>निवडणुक</u>**

राज्यात 29 महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचारानं गती घेतली आहे. विविध पक्षांच्या उमेदवारांकडून वैयक्तिक भेटीगाठींद्वारे तसंच प्रचार सभांद्वारे प्रचार सुरू झाला आहे. अंतिम उमेदवार यादीनुसार 2 हजार 869 प्रभागांमधून 15 हजार 931 उमेदवार रिंगणात आहेत. राज्यात सर्वाधिक सतराशे उमेदवार मुंबई महापालिका निवडणुकीत, तर सर्वात कमी 230 उमेदवार इचलकरंजी महापालिकेची निवडणूक लढवत आहेत. यंदाच्या निवडणुकीत अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या मुद्यावरून राजकीय पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल चंद्रपूर, अमरावती, अकोला याठिकाणी प्रचार सभा घेतल्या. महानगरपालिका निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून गेल्याबद्दल विरोधी पक्षांनी न्यायालयात धाव घेतली तरी जनादेश महायुतीच्या बाजूनंच असेल असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मुंबई महानगरपालिकेसाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी काल मुंबईत शिवसेना भवन इथं जाहीरनामा प्रकाशित केला. राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या बिनविरोध निवडणुकीला यावेळी दोन्ही नेत्यांनी विरोध केला. विरोधी उमेदवार नाहीत अशा ठिकाणी तिथली प्रक्रिया रद्द करून पुन्हा एकदा निवडणूक प्रक्रिया राबवावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

भाजपाचे सर्वाधिक बिनविरोध निवडून आलेले नगरसेवक म्हणजे हा भाजपाचा लोकशाही गुंडाळून ठेवण्याचा कारनामा असल्याची टिका कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर असूनही सत्ताधारी पक्षाचा प्रचार करत आहेत, त्यामुळं त्यांना निलंबित करावं अशी मागणीही उद्धव ठाकरे यांनी यावेळी केली.

**<u>जीरामजी-कोल्हापूर</u>**

विकसित भारत- जी राम जी योजना कष्टकऱ्यांना लाभदायकच असून या योजनेद्वारे कष्टकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासह ते ग्राम विकासात सार्थकपणे योगदान देतील असं प्रतिपादन केंद्रीय ग्रामिण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केलं. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. मोठ्या प्रमाणात अनुदान दिलेलं असूनही मनरेगातून कोणतीही स्थायी संपत्ती अथवा खेड्यांचा दिर्घकालीन विकासही झालेला नसल्याचं त्यांनी नमूद केलं. कॉंग्रेस पक्ष नव्या योजनेबद्दल दिशाभूल करुन मनरेगातील भ्रष्टाचारालाच संरक्षण देत असल्याचा आरोप चौहान यांनी यावेळी केला.

या योजनेबाबत कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील अंबप गावच्या सरपंच दीप्ती माने आकाशवाणीशी बोलताना म्हणाल्या......

**जी रामजी योजना म्हणजे विकसित भारत रोजगार आणि उपजीविका मिशन, ही योजना राबवत असताना मनरेगापेक्षा बदललेल्या निकषांमुळे ग्रामीण भागातील रोजगार उत्पन्न आणि पायाभूत सुविधांना चालना मिळणार आहे. विशेषतः तेहत्तीस टक्के महिलांना काम देणे अनिवार्य केले असल्यामुळे महिला सक्षमीकरणास मदत होणार आहे. योजनेचा राबवत असताना त्याचे नियोजन ग्रामपंचायत स्तरावर होणार असल्यामुळे गावातील प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत योजना मिळण्यासाठी त्याचा फायदा होणार आहे. पीक पीक काढणी आणि पेरणी हंगामामध्ये मजुरांना शेतात काम करण्याची संधी मिळणार असल्यामुळे याचा शेतीसाठी देखील फायदा होणार आहे.**

**ऊर्जा**

2025 या वर्षात ऊर्जा क्षेत्रात भारतानं उल्लेखनीय कामगिरी केली. 'सुधारणांचं वर्ष' या विशेष मालिकेत आज, भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीविषयी ऐकूया माझे सहकारी राजेंद्र लेले यांच्याकडून....

**2025 या वर्षात भारतासाठी सर्वात महत्त्वाची सुधारणा अणुऊर्जा क्षेत्रात घडली आहे. ती म्हणजे, शांती विधेयकाला मंजूरी, जवळपास सहा दशकांपासून अडथळा ठरणारी नागरी अणुऊर्जा क्षेत्राची जुनी चौकट शांती विधेयकातून अखेर मोडली गेली. या माध्यमातून खासगी क्षेत्राला परवानगी देण्यात आली असून अणुऊर्जेचा सुरक्षित, नियोजित आणि शाश्वत विस्तार कसा करायचा, याची स्पष्ट दिशा या विधेयकाने दिली आहे. 2025 मध्ये आणखी एक महत्त्वाचा आणि दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेला मुद्दा सरकारने ठामपणे हाताळला तो म्हणजे धोरणात्मक खनिजांचा प्रश्न. सुमारे 32 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह राष्ट्रीय क्रिटिकल मिनरल मिशन सुरू करण्यात आले आहे. इलेक्ट्रिक वाहनं, नवीकरणीय ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स आणि संरक्षण क्षेत्रासाठी अत्यावश्यक असलेल्या 24 महत्त्वाच्या खनिजांवर या मोहिमेचा भर आहे. नवीकरणीय ऊर्जेबाबतही भारताने समन्वयात्मक दृष्टिकोन स्वीकारला आहे. मोठी सौर उद्यानं आणि पवन ऊर्जा प्रकल्प तसंच पीएम सूर्य घर योजनेतून घरांच्या छतावर सौरऊर्जा, आणि पीएम-कुसुम योजनेद्वारे शेतकऱ्यांपर्यंत स्वच्छ ऊर्जा पोहोचवण्यात आली आहे. घरगुती वापर, शेती आणि उद्योग या तिन्ही क्षेत्रांमध्ये एकाच वेळी काम झाल्यामुळे नवीकरणीय ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार शक्य झाला आहे. 2025 मध्ये एकूण नवीकरणीय ऊर्जा क्षमतेत भारत जगात चौथ्या क्रमांकावर, पवन ऊर्जेत चौथ्या, आणि सौर ऊर्जेत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे.**

**कोस्टल हाफ मॅरेथॉन-रत्नागिरी**

तिसरी कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉन काल रत्नागिरीत मोठ्या उत्साहात पार पडली. देशातील 13 राज्यांतल्या 300 शहरांतले 2 हजार 2 शे हून अधिक धावपटू रत्नागिरीत मराठी भाषेसाठी धावले. 21 किलोमीटरच्या स्पर्धेत अभिषेक देवकातेनं स्वतःचाच विक्रम मोडून स्पर्धा जिंकली. अमोल आमुने दुसऱ्या, तर गौरव काकडे तिसऱ्या क्रमांकाचे मानकरी ठरले. महिलांमध्ये साक्षी जड्याळ, श्रेया पाटील, ऐश्वर्या लोंढे यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक मिळवले. 'एक धाव मराठी भाषेसाठी' अशी या स्पर्धेची संकल्पना असल्याचं सुवर्णसूर्य फाउंडेशनचे प्रसाद देवस्थळी यांनी सांगितलं. तर एखाद्या भाषेसाठी मॅरेथॉन होते, याचं हे जगातलं पहिलं उदाहरण असल्याची भावना मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केली.

**हवामान**

राज्यात बहुतांश ठिकाणी थंडीचा जोर कमी झाला आहे. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**